# ॥ श्री गुरुचरित्र अध्याय १४ ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥

॥ श्री सरस्वत्यै नमः ॥

॥ श्री गुरुभ्यो नमः ॥

**॥१॥**

नामधारक शिष्य देखा ।
विनवी सिद्धासी कवतुका ।
प्रश्न करी अतिविशेखा ।
एकचित्ते परियेसा ॥

**॥२॥**

जय जयाजी योगीश्वरा ।
सिद्धमूर्ति ज्ञानसागरा ।
पुढील कथा विस्तारा ।
ज्ञान होय आम्हांसी ॥

**॥३॥**

उदरव्यथेच्या ब्राह्मणासी ।
प्रसन्न झालें श्री गुरुकृपेसी ।
पुढे कथा वर्तली कैसी ।
विस्तारावे आम्हांप्रति ॥

**॥४॥**

ऐकोनि शिष्याचे वचन ।
संतोषें सिद्ध आपण ।
गुरुचरित्र कामधेनु जाण ।
सांगता जाहला विस्तारोनी ॥

**॥५॥**

ऐक शिष्या शिरोमणि ।
भिक्षा केली ज्याचे भुवनी ।
तयावरी संतोषोनि ।
प्रसन्न जाहले परियेसा ॥

**॥६॥**

गुरुभक्तीचा प्रकार ।
पूर्ण जाणे द्विजवर ।
पूजा केली विचित्र ।
म्हणोनि आनंदे परियेसा ॥

॥७॥

तया सायंदेव द्विजासी ।
श्रीगुरू बोलती संतोषी ।
भक्त व्हावें वंशोवंशी ।
माझी प्रीति तुजवरी ॥

॥८॥

ऐकोनि श्रीगुरुचे वचन ।
सायंदेव नमन करून ।
माथा चरणी ठेवून ।
नमता झाला पुनः पुन्हा ॥

॥९॥

जय जयाजी सद्‌गुरु ।
त्रिमूर्तींचा अवतारू ।
अविद्यामाये दिससी नरु ।
वेदां अगोचरु तुझा महिमा ॥

॥१०॥

विश्वव्यापक तूंचि होसी ।
ब्रह्मा-विष्णु-व्योमकेशी ।
धरिलें स्वरूप तू मानवासी ।
भक्तजन तारावया ॥

॥११॥

तव महिमा वर्णावयासी ।
शक्ति कैंची आम्हांसी ।
मागतो एक तुम्हांसी ।
कृपा करणे गुरुमूर्ति ॥

॥१२॥

माझे वंशपारंपरी ।
भक्ति द्यावी निर्धारी ।
इहे सौख्य पुत्रपौत्री ।
अंती द्यावी सद्गति ॥

**॥१३॥**

ऐसी विनंति करुनी ।
पुनरपि विनवी करुणावचनी ।
सेवा करितो द्वारी यवनी ।
महाक्रुर असे तो ॥

**॥१४॥**

प्रतिसंवत्सरी ब्राह्मणांसी ।
घात करितो जो बहुवसी ।
याचि कारणे आम्हांसी ।
बोलावीतसे परियेसा ॥

**॥१५॥**

जातां तया जवळी आपण ।
निश्चये घेईल माझा प्राण ।
भेटी झाली तुमची म्हणोन ।
मरण कैचे आम्हांसी ॥

**॥१६॥**

संतोषोनि श्रीगुरूमूर्ति ।
अभय देती तयाप्रती ।
विप्रमस्तकी हस्त ठेविती ।
चिंता न करी म्हणोनिया ॥

**॥१७॥**

भय सांडूनि त्वां जावे ।
क्रुर यवनातें भेटावे ।
संतोषोनि प्रियभावे ।
पुनरपि पाठवील आम्हांप्रती ॥

**॥१८॥**

जोवरी परतोनि तू येसी ।
असो आम्ही भरंवसी ।
तू आलिया संतोषी ।
जाऊ मग येथोनिया ॥

**॥१९॥**

निजभक्त आमुचा तूचि होसी ।
परंपरी-वंशोवंशी ।
अखिलाभीष्ट तू पावसी ।
वाढेल संतति तुझी बहुत ॥

**॥२०॥**

तुझे वंशपरंपरी ।
सुखे नांदती पुत्रपौत्री ।
अखंड लक्ष्मी तुझें घरी ।
निरोगी शतायु नांदाल ॥

**॥२१॥**

ऐसा वर लाधोन ।
निघे सायंदेव ब्राह्मण ।
जेथे होता तो यवन ।
गेला त्वरित तयाजवळी ॥

**॥२२॥**

कालांतक यम देखा ।
यवन दुष्ट परियेसा ।
ब्राह्मणाते पाहतां कैसा ।
ज्वालारूप होता जाहला ॥

**॥२३॥**

विन्मुख होऊनि गृहांत ।
गेला यवन कोपात ।
विप्र जाहला भयचकित ।
मनीं श्रीगुरू ध्यातसे ॥

**॥२४॥**

कोप आलिया ओळंबयासी ।
केवी स्पर्शे अग्नीसी ।
श्रीगुरुकृपा असे ज्यासी ।
काय करील यवन दुष्ट ॥

**॥२५॥**

गरुडाचिया पिलीयांसी ।
सर्प कैसा डंसी ।
तैसी तया ब्राह्मणासी ।
असे कृपा श्रीगुरुची ॥

**॥२६॥**

कां एखादे सिंहासी ।
ऐरावत केवीं ग्रासी ।
श्रीगुरुकृपा ज्यासी ।
कळीकाळाचे भय नाही ॥

**॥२७॥**

ज्याचे ह्रदयीं श्रीगुरुस्मरण ।
भय कैंचे तयां दारुण ।
काळमृत्यु न बाधे जाण ।
अपमृत्यु काय करील ॥

**॥२८॥**

ज्यासि नांही मृत्यूचे भय ।
त्यासी यवन करील काय ।
श्रीगुरुकृपा ज्यासी होय ।
यमाचे भय नाही तयां ॥

**॥२९॥**

ऐसियापरी तो यवन ।
गृहीं निघाला भ्रमें करून ।
दृढ निद्रा लागतां जाण ।
शरीरस्मरण नाही त्यासी ॥

**॥३०॥**

हृदयज्वाळा होऊनी त्यासी ।
जागृत होवोनि परियेसी ।
प्राणांतक व्यथेसी ।
कष्टतसे तये वेळी ॥

**॥३१॥**

स्मरण नसे कांही ।
म्हणे शस्त्रे मारितो घाई ।
छेदन करितो अवेव पाही ।
विप्र एक आपणासी ॥

**॥३२॥**

स्मरण जाहले तये वेळी ।
धांवत गेला ब्राह्मणाजवळी ।
लोळतसे चरणकमळी ।
म्हणे स्वामी तूंचि माझा ॥

**॥३३॥**

तूतें पाचारिले येथे कवणी ।
जावे त्वरित परतोनि ।
वस्त्रे भूषणे देवोनि ।
निरोप देत तये वेळी ॥

**॥३४॥**

संतोषोनि द्विजवर ।
आला ग्रामीं सत्वर ।
गंगातीरी जाय लवकर ।
श्रीगुरुचे दर्शनासी ॥

**॥३५॥**

देखोनिया श्रीगुरूसी ।
नमन करी भावेसी ।
स्तोत्र करी बहुवसी ।
सांगे वृत्तांत आद्यंत ॥

**॥३६॥**

संतोषोनि श्रीगुरूमूर्ति ।
तया द्विजा आश्वासिती ।
दक्षिणदिशें जाऊ म्हणती ।
स्थान तीर्थयात्रेसी ॥

**॥३७॥**

ऐकोनि श्रीगुरुंचे वचन ।
विनवीतसे कर जोडून ।
न विसंबे आतां तुमचे चरण ।
आपण येईन समागमे ॥

**॥३८॥**

तुमचे चरणाविणे देखा ।
राहो न शके क्षण एका ।
संसारसागर तारका ।
तूंचि देवा कृपासिंधु ॥

**॥३९॥**

उद्धरायां सगरांसी ।
गंगा आली भूमीसी ।
तैसा स्वामी आम्हांसी ।
स्पर्शनें उद्धार आपुल्या ॥

**॥४०॥**

भक्तवत्सल तुझी ख्याति ।
आम्हा सांडणे काय नीति ।
सवेचि येऊ हें निश्चिती ।
म्हणोनि चरणी लागला ॥

**॥४१॥**

येणेपरी श्रीगुरूसी ।
विनवी विप्र भावेसी ।
संतोषोनि विनयेसी ।
श्रीगुरू म्हणती तये वेळी ॥

**॥४२॥**

कारण असे आम्हा जाणे ।
तीर्थे असती दक्षिणे ।
पुनरपि तुम्हां दर्शन देणे ।
संवत्सरी पंचदशी ॥

**॥४३॥**

आम्ही तुमचे ग्रामांसमीपत ।
वास करू हे निश्चित ।
कलत्र पुत्र इष्ट भ्रात ।
तुम्ही आम्हां भेटावें ॥

**॥४४॥**

न करी चिंता असा सुखे ।
सकळ अरिष्टे गेली दुःखे ।
म्हणोनि हस्त ठेवीं मस्तकी ।
भाक देती तये वेळी ॥

**॥४५॥**

ऐसेपरी सांगोनि ।
श्रीगुरू निघाले तेथोनि ।
जेथे असे आरोग्यभवानी ।
वैजनाथ महाक्षेत्र तें ॥

**॥४६॥**

समस्त शिष्यांसमवेत ।
श्रीगुरू आले तीर्थे पहात ।
प्रख्यात असे वैजनाथ ।
तेथे राहिले गुप्तरूपे ॥

**॥४७॥**

नामधारक विनवी सिद्धासी ।
कारण काय गुप्त व्हावयासी ।
होते शिष्य बहुवसी ।
त्यांसी कोठे ठेविले ॥

**॥४८॥**

गंगाधराचा नंदन ।
सांगे गुरुचरित्र वर्णन ।
सिद्धमुनि विस्तारून ।
सांगे नामधारकासी ॥

**॥४९॥**

पुढील कथेचा विस्तार ।
सांगतसे अपरंपार ।
मन करूनि एकाग्र ।
ऐका श्रोते सकळिक ॥

**॥५०॥**

वास सरस्वतीचे तीरीं ।
सायंदेव साचारी ।
तया गुरुतें निर्धारी ।
वस्त्रें भूषणें दिधलीं ॥

**॥५१॥**

गुरुचरित्र अमृत ।
सायंदेव आख्यान येथ ।
यवन भय रक्षित ।
थोर भाग्य तयाचें ॥

**॥**

इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ
श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे
दुष्टयवनशासनं-सायंदेववरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥
॥ श्रीगुरुदेव दत्त ॥